Reader's Sanctuary

Sumantra



# देवयानी
# आणि
# पिवळे फुलपाखरू

**सहभाग**

देवयानी आणि तिचे इतर मित्र व मैत्रिणी

**संकल्पना**

श्रीशैल बिराजदार,

रीडर्स सॅन्चुअरी

Reader's Sanctuary

**सौजन्य**

सूमंत्र सायकॉलॉजीकल

कौन्सेलिंग सेंटर

Sumantra

**चित्र**

AI द्वारा

परवा संध्याकाळी, मी आमच्या घराजवळच्या बागेत खेळायला गेले होते. खेळता खेळता माझं लक्ष एका झाडाच्या फांदीकडे गेलं. त्या फांदीवरच्या पानावर मला एक छोटंसं, सुंदर असं अंड दिसलं.





मला गंमत वाटली,
थोड्यावेळ निरखून
पाहिल्यावर मी परत
खेळायला जाऊ लागले.
जाता जाता मी पुन्हा पुन्हा
त्याच्याकडे पाहत होते.
नंतर मी बराच वेळ
खेळण्यात गुंगून गेले. खूप
खेळून दमल्यानंतर दम
खायला थांबले.

म़ला पानावर असलेल्या
त्या छोटुश्या अंड्याची
आठवण आली. तिथं
पोहचल्यावर बघते तर
काय,  तिथं अंड नव्हतं.
त्या अंड्याच्या जागी एक
अळी डुलत डुलत फिरत
होती. मला खूप आश्चर्य
वाटलं, कि हे कसं घडल?
अंड खाल्ल कि काय
अळीने ?



रात्री घरी आल्यावर माझ्या मनात अनेक विचार येऊ लागले. अंड्यातूनच अळी बाहेर आली असेल, आणि त्याचच फुलपाखरू बनत असेल?





असाही विचार आला की ती अळी पिवळं फुलपाखरू होईल का? मी रात्रभर हाच विचार करत झोपी गेले की उद्या मला काय बघायला मिळेल?

सकाळी लवकर उठले, शाळेत जाऊन आले आणि संध्याकाळी गडबडीने आईला घेऊन पुन्हा बागेत गेले. खेळायला जायच्या आधी त्या अळीच काय झालं असेल? हे बघायला जायची माझी खूप इच्छा होती.





पण तिकडे मला अनन्या
आणि तिची आई भेटली.
मग मी अनन्यासोबत
खेळायला गेले. खेळता
खेळता मी अनन्याला न
सांगता, हळूच तिच्या
नजरेपासून दूर झाले,
आणि चोरून त्या
झाडाकडे गेले.

जवळ जाऊन पाहिलं तर तिथे एक सुंदर, पिवळसर-गडद रंगाचं फुलपाखरू बसलेलं होतं.

मी त्या फुलपाखराला हात लावला.  ते फुलपाखरू उडून येऊन माझ्या खांद्यावर बसलं.





त्या वेळी अनन्या मला दूरून पाहत होती. तिच्या डोळ्यांत आश्चर्य दिसत होतं. तिने मोठ्याने मला हाक मारली. "देवयानी ए देवयानी". आणि तसच ..




ती पळत-पळत माझ्याकडे आली. तिला फुलपाखराला हात लावायचा मोह झाला.

अनन्या आनंदाने म्हणाली, “किती छान! आहे हे पिवळ्या रंगाचं फुलपाखरू आहे,? कित्ती गोड दिसतंय हे फुलपाखरू”.



इतक्यात आयुषसुद्धा धावत माझ्याकडे आला.

आयुषने उडी मारून फुलपाखराला धरायचा प्रयत्न केला. पण पकडायच्या आधीच फुलपाखरू उडालं आणि तो गवतात धपकन पडला. तसं मला जोरात हसायला आलं.




मी फुलपाखराला हाक मारली आणि फुलपाखरू चक्क उडत-उडत येऊन माझ्या खांद्यावर बसलं.

आमचा गोंधळ पाहून आई तिकडे आली आणि म्हणाली, “चला आता, खूप उशीर झाला आहे.”



मग आम्ही सगळ्यांनी फुलपाखराला "बाय-बाय" करून निरोप दिला. फुलपाखरू  उंच आकाशात उडून गेल.

Reader's Sanctuary


Reader's Sanctuary
www.readerssanctuary.org
shrishail@readerssanctuary.org